# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- २५/१०/२०१७

बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे पंकज उर्फ पंक्या भाऊराव शिंदे, वय १९ वर्षे, रा. स.नं. ६४८/१३, साईनगर, अपर बिबवेवाडी पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ४३/२०१७ दिनांक २५/१०/२०१७ रोजी एक वर्षा करीता पुणे शहर हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम बेकायदेशिर जमावाचा सभासद, दंगा करणे, प्राणघातक शस्त्रानिशी सज्ज होवून दंगा करणे, खून करण्याचा प्रयत्न, नुकसान करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, जबरी चोरी, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने दुखापत पोहचवणे, हाताने मारहाण करणे, सामाईक इरादा वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द बिबवेवाडी आणि सहकारनगर पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर हद्दीतून एक वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- २५/१०/२०१७

बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे आकाश उर्फ अक्षय संजय लोखंडे, वय २१ वर्षे, रा. स.नं. ६४८/३, पवननगर, मारुती मंदीराजवळ, बिबवेवाडी पुणे आणि स.नं. १९ स्वामीनगर, आंबेगाव पठार, रामदेव सुपर मार्केट धनकवडी पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ४२/२०१७ दिनांक २५/१०/२०१७ रोजी एक वर्षाकरीता पुणे शहर हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम बेकायदेशिर जमावाचा सभासद, दंगा करणे, प्राणघातक शस्त्रानिशी सज्ज होवून दंगा करणे, खून करण्याचा प्रयत्न, नुकसान करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, जबरी चोरी, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने दुखापत पोहचवणे, हाताने मारहाण करणे, सामाईक इरादा वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द बिबवेवाडी आणि सहकारनगर पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर हद्दीतून एक वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.